जनहित याचिका क्र.९/२०१७ च्या अनुषंगाने राज्यातील कारागृहामधील नविन बॅरेकचे बांधकाम/ दुरुस्ती/नुतनीकरण इत्यादी याकामांच्या अंदाजपत्रकांस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्र. जेएलएम-०९१८/प्र.क्र.१५९/तुरुंग-२,

मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २४ मे, २०१९.

वाचा:

१. अपर पोलीस महासंचालक, कारागृह महानिरीक्षक व सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. बीएलडी/४०५९ अंदाजपत्रक/फेर सादर/दुरुस्ती-निधी/९०५८/हस्तपोच/२०१८ कक्ष-६ (३), दिनांक २५.९.२०१८.
२. शासन निर्णय क्र. जेएलएम-०९१८/प्र.क्र.१५९/तुरुंग-२, दिनांक १३.०२.२०१९.
३. अपर पोलीस महासंचालक, कारागृह महानिरीक्षक व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्रे क्र. बीएलडी/अहमदनगर जि.का./नविन बॅरेक/बांधकाम/प्रस्ताव/२८९३/१९ कक्ष-६ (३) पुणे -१, दिनांक १६.३.२०१९, बीएलडी/यवतमाळ जि.का.न. महिला बॅरेक/ प्रस्ताव/२८९२/१९/कक्ष-६ (३) पुणे-१ व क्र.बीएलडी/यवतमाळ जि.का./G+१/ पाकगृह/प्रस्ताव/२८९१/१९ कक्ष -६ (३) पुणे-१, दिनांक २६.३.२०१९

प्रस्तावना:

जनहित याचिका क्र.९/२०१७ च्या अनुषंगाने **कारागृहामधील नविन बॅरेकचे बांधकाम/ दुरुस्ती/नुतनीकरण याबाबतची प्रलंबित व अत्यावश्यक कामे तातडीने करुन घेणे गरजेचे असल्याने एकूण २७ कामापैकी १७** प्रस्तावांस सार्वजनिक बांधकाम विभागाने छाननीअंती आकस्मिक खर्च, सेंटेज चार्जेस व जी.एस.टी. अंतर्भूत करुन परिगणित करण्यात आलेल्या रु.९,४२,१९,७८३/- (रुपये नऊ कोटी बेचाळीस लक्ष एकोणीस हजार सातशे त्र्याऐंशी फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. उर्वरित १७ प्रस्तावांपैकी संदर्भीय क्र.३ च्या पत्रान्वये अहमदनगर जिल्हा कारागृहातील पहिल्या मजल्यावर नवीन बॅरेक बांधणे, यवतमाळ जिल्हा कारागृह येथे महिला बंद्यांसाठी नवीन बॅरेक बांधणे व यवतमाळ जिल्हा कारागृह येथे स्वयंपाकांसाठी G+१ बॅरेकचे बांधकाम करणे या ३ प्रस्तावांस सार्वजनिक बांधकाम विभागाने छाननीअंती आकस्मिक खर्च, सेंटेज चार्जेस व जी.एस.टी. अंतर्भूत करुन परिगणित करण्यात आलेल्या रु. ३,२६,७२,६०६/- (अक्षरी रुपये तीन कोटी सव्वीस लाख बहात्तर हजार सहाशे सहा फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिली आहे. त्यास अनुसरुन याद्वारे शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:

जनहित याचिका क्र.९/२०१७ च्या अनुषंगाने राज्यातील कारागृहामधील नविन बॅरेकचे बांधकाम/ दुरुस्ती/नुतनीकरण इत्यादी या सोबतच्या यादीत नमूद ३ कामांना त्यांचे नावासमोर दाखविलेल्या रक्कमेच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

कामांची यादी

अ.क्र.	कामाचे नाव	रुपये (लाखात)
१	अहमदनगर जिल्हा कारागृहातील पहिल्या मजल्यावर नविन बॅरेक बांधणे	रु. ४६,९१,६०६/-
२	यवतमाळ जिल्हा कारागृह येथे महिला बंद्यांसाठी नविन बॅरेक बांधणे	रु.१,४९,१०,०००/-
३	यवतमाळ जिल्हा कारागृह येथे स्वयंपाकांसाठी G+1 बॅरेकचे बांधकाम करणे	रु.१,३०,७१,०००/-
(अक्षरी एकूण रुपये तीन कोटी सव्वीस लाख बहात्तर हजार सहाशे सहा फक्त)		रु.३,२६,७२,६०६ /-

२. सदर अंदाजपत्रकामध्ये वस्तु व सेवा कर १२ टक्के साठी तरतूदी समाविष्ट करण्यात आली आहे. तसेच नवीन बॅरेक बांधकामांचे अंदाजपत्रके, नकाशे साक्षांकित करणे आवश्यक राहील.

३. या साठी होणारा खर्च मागणी क्र. एच-८, ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च (४०५९ ०९१२) (०१) (१०१)/ (११) (०१) (तुरुंग) (योजनांतर्गत योजना) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणा-या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग- पहिला, उपविभाग-पाच, अनुक्रमांक -३, नियम १३४ अन्वये प्रशासनिक विभागांना प्रदान करण्यात आलेले अधिकार व सार्वजनिक बांधकाम विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.२०१/१९/इमा-२, दिनांक ०४.०५.२०१९ द्वारे दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६०३१५५४२७६०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Narayan Shrikrishna Karad

Digitally signed by Narayan Shrikrishna Karad
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9a5ba422569807a70f83ba75f7e5057f99ed671bf7ac8f8fb14e28b9d6f90514, cn=Narayan Shrikrishna Karad
Date: 2019.06.03 16:04:28 +05'30'

(ना. श्री. कराड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) अपर मुख्य सचिव,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,

२) सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
३) पोलीस महासंचालक (कारागृह), महाराष्ट्र राज्य,मुंबई,
४) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५) विशेष पोलीस महानिरिक्षक (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, पुणे,
६) विशेष पोलीस महानिरिक्षक, दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई,
७) कारागृह उपमहानिरिक्षक, दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई,
८) महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई,
९) महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर,
१०) जिल्हा कोषागार अधिकारी,
११) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
१२) सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई,
१३) कक्ष अधिकारी, (बियुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४) निवडनस्ती तुरुंग २, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

****